**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक 18 / 10 / 2023 (बुधवार) सायंकाळ

---

## मोटरपंप चोरी

**पो.स्टे. वेलतूर** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील जिवनापुर शेत शिवार येथे दिनांक १७/१०/२०२३ चे १६.०० वा. ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– उमेश मसरामजी मुळे, वय ३२ वर्ष, रा. पचखेडी ता. कुही याचे शेत हे जिवनापुर शेत शिवारात असुन शेतात मिर्चीच्या पिकाला पाणी देण्याकरीता एक एच पी. लक्ष्मी कंपनीची मोटार लावण्यात आली होती. फिर्यादी हे आपल्या शेतावर सायंकाळी १७/०० वा. मिर्चीला पाणी देवुन मोटार बंद करून घरी गेले व रात्री १९/०० वा. पुन्हा मिर्चीला पाणी देण्याकरीता शेतावर गेले असता फिर्यादी याने आपल्या शेतात असलेल्या लाईटच्या उजेडात पाहणी केली असता शेतात पाणी देण्याकरीता लावलेली जुनी वापरती पेंट निघालेली एक एच पी. लक्ष्मी कंपणीची मोटार किंमती अंदाजे ३,०००/– रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वेलतूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सतीश पाटील पोस्टे वेलतुर हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मायवाडी येथे दिनांक १७/१०/२०२३ चे १२.०० वा. १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सतीष प्रताप कुमरिया, वय ३२ वर्ष, रा. मायवाडी ता. नरखेड जि. नागपुर याने आरोपी नामे– संदीप प्रताप कुमरिया, वय ३० वर्ष, रा. मायवाडी ता. नरखेड जि. नागपुर यांचे शेत बटाईने केले असुन यातील आरोपी हे मोसंबी तोडत असता फिर्यादीने म्हटले की हे मोसंबी मीच घेतली असुन त्याचे तुला पैसे दिले आहे यावरून आरोपी म्हणाला कि मी कोणाला माझे शेत बटाईने दिले नसुन पैसे सुदधा घेतले नाही असे म्हणुन आरोपीने हातात गोटा धरून फिर्यादीचे डाव्या कपाळावर गोटा मारून शिविगाळ करून ''मी मरून तुला फसवुन टाकीन'' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक दिनेश जोगेकर ब.न. १००६ पोलीस स्टेशन जलालखेडा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर